SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

(असाधारण)

सोमवार, दिनांक ४ ऑक्टोबर, २०२१

अधिसूचना

क्र. - ९२ /२०२१ दिनांक - ४.१०.२०२१

विषय : महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ ..... अधिष्ठाता तदर्थ नामनिर्देशनाबाबत

संदर्भ : १) असाधारण अधिसूचना क्र. ३०/२०१८, दि. १३.४.२०१८
२) असाधारण अधिसूचना क्र. ३५/२०१९, दि. १६.४.२०१९
३) असाधारण अधिसूचना क्र. ४०/२०२०, दि. २०.४.२०२०
४) अधिसूचना क्र. ४/२०२१, दि. ७.१.२०२१
५) असाधारण अधिसूचना क्र. ४०/२०२१, दि. १६.४.२०२१
६) असाधारण अधिसचूना क्र. ५३/२०२१, दि. २.६.२०२१

संदर्भीय क्र. १) वरील अधिसूचनेमध्ये उल्लेखित विद्यापीठ प्रस्ताव व त्यानुषंगाने मा.कुलपती कार्यालयाने दिलेल्या मान्यतेच्या अधीन राहून अधिसूचनेतील वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा आणि आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखांकरिता अधिष्ठात्यांचे तदर्थ नामनिर्देशन करण्यात आले होते.

सर्व सामान्यांच्या माहितीकरीता याद्वारे अधिसूचित करण्यात येते की, संदर्भीय क्र. ४ व ५ वरील अधिसूचनेच्या माध्यमातून अधिसूचनेमध्ये उल्लेखित विद्याशाखांचे तदर्थ अधिष्ठाते, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १५(३) च्या परंतुकाअंतर्गत हंगामी कुलगुरूंनी, संदर्भीय क्र. ६ वरील अधिसूचनेद्वारे सदर्हू विद्याशाखांच्या शैक्षणिक कामकाजामध्ये अडथळा निर्माण होऊ नये म्हणून दि. २.६.२०२१ पासून नवीन नामनिर्देशन होईपर्यंत किंवा नवीन अधिष्ठात्यांची नियुक्ती होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल अशा कालावधीसाठी नामनिर्देशीत केले होते. तथापि, सदर्हू केलेल्या नामनिर्देशनाला मा.कुलगुरूंनी, कलम १५(३) अंतर्गत, नवीन नामनिर्देशन होईपर्यंत किंवा नवीन अधिष्ठात्यांची नियुक्ती होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल अशा कालावधीसाठी पुन्हा मुदतवाढ देण्याला मान्यता प्रदान केली आहे.

स्वा/-
(डॉ.तुषार देशमुख)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****